नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 29/01/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 15 किमी अंतरावर पाटणसावंगी शिवार पोळा मैदान येथे दिनांक 28/01/2021 चे 08.15 वा. दरम्यान विना क्रमांकाचा ट्रैक्टर व ट्रॉलीचा चालक आरोपी नामे– रवी श्रावण चापले, वय 30 वर्ष, रा. पाटणसावंगी याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 4,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 1,50,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार क्रिष्णा जुनघरे, पो. स्टे. सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा क्रिष्णा जुनघरे 9284890174 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत बॅक ऑफ बडोदा मौदा येथे दिनांक 28/01/2021 चे 12.10 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौरभ बंडुजी तिघरे, वय 23 वर्ष, रा. माथनी ता. मौदा जि. नागपुर हा त्याच्या एमएच– 40/झेड– 5686 क्रमांकाच्या मोटारसायकलने दुपारी बॅक ऑफ बडोदा मौदा येथे 35,000/–रू. जमा करण्यासाठी नेले होते. त्यादरम्यान फिर्यादीने पैश्याची प्लास्टीक पिशवि ही गाडीला लटकवुन ठेवली. यानंतर फिर्यादी हा फोन वर बोलत असता अज्ञात आरोपीने फिर्यादीची प्लास्टीक पिशवि मध्ये ठेवलेले 35,000/– रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुथे 9764007720 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. पारशिवनी :– दि. 28/01/2021 चे 17:30 वा. चे सुमारास 32 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि आपले घरी नळाचे पाणी भरत असता आरोपी नामे– आकाश अरविंद धुरई, रा. वार्ड क्र. 6, पारशिवनी याने त्याचे घरासमोर पाणीसांडण्याचे कारणावरून फिर्यादीला शिवीगाळ करून काडीने डाव्या हातावर मारून तिच्या सोबत लांबाझोबी करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. नंदा चंद्रशेखर धुरई, वय. 32 वर्ष, रा. वार्ड क्र. 6 पारशिवनी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा दिलीप बासोडे. 9823083905 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर